N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** सातारा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1114  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/12/2024 23:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 3(5) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 03/12/2024

**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/12/2024

**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/12/2024  **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 076

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/12/2024 23:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हटेल मानसी इन विलासपुर, सतारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

सातारा शहर पोलीस ठाणे सातारा

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संयुक्ता राजेंद्र होळकर

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : राजेंद्र होळकर

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2000

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 8/9, डीएससी क्वार्टर्स ,इंजिन हाउस रोड बोट क्लब, खडकी, पुणे 03, सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 8/9, डीएससी क्वार्टर्स ,इंजिन हाउस रोड बोट क्लब, खडकी, पुणे 03, सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8308720611

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद मोहन खरात | | | 1. खरातवस्ती, दहीवडी,ता माण , सातारा,सातारा शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | किशोर संभाजी खरात | | | 1. 70/9, बीडीडीचाळ, वरळी, मुंबई,सातारा शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |
| 3 | धनंजय निकम | | | 1. जिल्हा सत्र न्यायाधीश,सातारा , सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र, |



सातारा शहर पोलीस स्टेशन सातारा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भारत |
| 4 | अनोळखी 1 | | | |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब तारीख 10/12/2024

माझे नाव कु. संयुक्ता राजेंद्र होळकर वय 24 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. 8/9, डीएससी क्वार्टर्स, इंजिन हाउस रोड बोट क्लब, खडकी, पुणे 03, मोबाईल नंबर 8308720611.

समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब देते की, मी वरील ठिकाणी माझे वडील श्री. राजेंद्र दत्तात्रय होळकर आई सौ. मनिषा राजेंद्र होळकर, भाऊ साहिल यांचेसह एकत्रांत राहण्यास आहे. माझे वडील 512 आर्मी बेस वर्कशॉप, खडकी या ठिकाणी सहा.कार्यकारी अभियंता या पदावर नोकरीस आहेत.

माझे वडीलांचे विरोधात सातारा शहर पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. 972/2024, भा.दं.वि.कलम 420,406,34 प्रमाणे गुन्हा दाखल असून सध्या ते जेलमध्ये आहे. सदर गुन्हयातून जामीनावर सुटण्याकरीता मी माझे वडीलांचा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सातारा यांचेकडे जामीन अर्ज केला होता परंतु त्यांचा जामीन अर्ज नामंजुर झाला, त्यानंतर आम्ही मा. जिल्हा सत्र न्यायालय, सातारा येथे जामीन मिळण्याकरीता अर्ज दाखल केला असून त्याची सातारा सत्र न्यायालय क्रं 3 येथे सुनावणी चालु होती. दि. 29/11/2024 रोजी माझे राहते घरी अचानक एक व्यक्ती आला व त्याने त्याचे नाव सम्राट जाधव असे असल्याचे सं○गुन मी साता-यावरुन आलो असल्याचे सांगितले तेव्हा त्याने मला माझे वडील अटक असलेल्या गुन्हयात जामीनासाठी मदत करणार आहे असे सांगून प्रोटोकॉल पाळावा लागेल असे म्हणाला त्यानंतर त्याने दि. 30/11/2024 रोजी 20.13 वा. माझे मोबाईलवर कॉल केला तेव्हा त्यांना मी नक्की काय प्रेटोकॉल पाळावा लागेल असे विचारले असता त्या इसमाने मला सांगितले की, तुमचा जामीन अर्ज नाकारला तर तुम्हाला हायकोर्टात जावे लागेल त्याकरीता सात ते आठ लाख रूपये खर्च येईल व त्याकरीता सहा महिने थांबावे लागेल त्या हिशोबाने 5 डॉक्युमेंट दयावे लागतील असे म्हणून पाच लाख रूपयांची मागणी केली तसेच पैशांची जुळवाजुळव करण्याकरीता आठ दिवसांचा अवधी देतो व जामीन अर्ज सुनावणीची दिनांक 09/12/2024 तारीख ठेवतो असे त्यांनी मला सांगितले त्यानंतर मी त्यास दि. 30/11/2024 रोजीच्या सुनावणीबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला सध्या तुमची ऑर्डर होत नाही असे बोलून फोन कट केला. त्यानंतर त्याच दिवशी मला रात्री 09.45 वा. त्याच नंबरवरून मला पुन्हा सम्राट जाधव नावाचे व्यक्तीचा फोन आला तेव्हा त्याने मला नऊ तारीख देत होतो पण तुमच्या वकीलांनी वेळ नसल्याने दहा तारीख घेतली असल्याचे सांगितले. त्यानंतर माझी खात्री झाल्याने मी त्यांना भेटण्याकरीता दि. 03/12/2024 ही तारीख फिक्स केली. परंतु मला पैसे दयायचे नसल्याने मी दिनांक 02/12/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे येऊन लेखी तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने लाप्रवि पुणे येथील श्री. अनिल कटके साहेबांनी दिनांक 03/12/2024 रोजी

पडताळणी केली असता मला श्री. सम्राट जाधव व त्यांचा मित्र किशोर यांनी जामीन अर्जाचे सुनावणीची तारीख 10 तारीख असल्याचे सांगितले, तसेच जर तुम्ही दि. 09/12/2024 रोजी ऑफीस संपल्यानंतर आला तर तुमची गुपचुप कोर्टाचे न्यायाधीश यांची भेट पण घालून देऊ शकतो असे म्हणाले व माझ्या वडीलांचा जामीन करुन देण्याकरीता रू. 5,00,000/- लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच खाजगी इसम श्री. सम्राट जाधव व किशोर यांनी मला न्यायाधीश साहेब यांची भेट करुन देतेवेळी एम.एस.ई.बी. हा कोड वर्ड वापरणार असल्याचे सांगुन आम्ही न्यायाधिश साहेबांशी चर्चा करणार ते तुम्ही व्यवस्थित ऐका आम्ही प्रकरणासंदर्भात थेटपणे बोलणार नाही असे खाजगी इसमाने मला पडताळणी दरम्यान सांगितले.

त्यानंतर दिनांक 09/12/2024 रोजी खाजगी इसम श्री. किशोर व श्री. सम्राट जाधव यांचे सांगण्याप्रमाणे मी न्यायाधीश यांची भेट घेण्याकरीता सातारा या ठिकाणी सापळा पथकासोबत गेले. त्यादरम्यान खाजगी इसम श्री. सम्राट जाधव व किशोर यांनी मला फोनवरुन तुम्ही कोर्ट रुममध्ये जाऊन जे जज साहेब आहेत त्यांचा चेहरा बघुन घेण्यास सांगितले. त्यानुसार श्री. अनिल कटके साहेबांनी मला पंच श्री. धिकार यांचे सोबत जावुन सातारा जिल्हा सत्र न्यायालय येथील कोर्ट रुममध्ये जाऊन न्यायाधीश श्री. निकम यांचा चेहरा पाहुन येण्यास सांगितले त्याप्रमाणे मी व पंच श्री. धिकार असे दोघांनी कोर्टात जावुन न्यायाधिश श्री. निकम यांचा चेहरा पाहीला. त्यानंतर सायंकाळी कार्यालयीन वेळ संपल्यानंतर खाजगी इसम श्री. सम्राट जाधव व किशोर यांनी माझी व न्यायाधिश यांची भेट घालुन देणार व त्याभेटीच्या वेळी न्यायाधीश श्री. निकम यांना एम.एस.ई.बी चे काम असा कोडवर्ड वापरणार असल्याचे मला सांगितले. त्यानंतर खाजगी इसम श्री. किशोर यांनी न्यायाधीश श्री. निकम यांचेशी संपर्क करुन त्यांना बांधकाम भवन, सातारा परिसरात बोलावून घेतले होते त्यानुसार मी ला.प्र.वि.कडील शासकीय वाहनाने जिल्हा परिषद जवळ गेलो तेथे आम्ही गाडी लावली नंतर मी व पंच क्र. 1 असे दोघेजण सातारा जिल्हा न्यायालयाशेजारील बांधकाम भवन या ठिकाणी पायी चालत गेलो तेथे पोहोचल्यानंतर आम्ही खाजगी इसम सम्राट जाधव व त्याचा मित्र याची वाट पाहत असतानाच श्री. सम्राट जाधव याचा माझे मोबाईलवर फोन आला व त्याने मला मी कोठे आहे असे विचारले तेव्हा मी त्यास बांधकाम भवन या ठिकाणी असणारे कॉर्नरला पोहोचले असल्याचे सांगितले तेव्हा त्यांनी मला ते सध्या हायवे रोडवर असून 4499 नंबर असणारे इनोव्हा कारमधून येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांच्या इनोव्हा गाडीची वाट पाहत तेथेच थांबून राहीलो त्यानंतर काहीवेळात इनोव्हा कार नं. एम.एच.16 बी.एच. 4499 ही गाडी आमचेजवळ येऊन कॉर्नरला येऊन थांबली त्यातून सम्राट जाधव याचा मित्र खाली उतरला व त्याने मला चला, गाडीत बसा असे म्हणून मला गाडीत बसण्यास सांगितले त्यानुसार मी व पंच क्र. 1 श्री. धिकार असे आम्ही दोघेजण सम्राट जाधव यांचे गाडीत बसलो. सम्राट जाधव यांनी गाडीचे ड्रायव्हरला गाडी पार्कीगमध्ये घेण्यास सांगितले त्यानुसार त्यांचे गाडीवरील ड्रायव्हरने गाडी एका बाजूला घेतली त्यादरम्यान सम्राट जाधव याचेसोबत बोलत असताना मी त्यांचे मित्राला त्याचे नाव विचारुन घेतले तेव्हा त्याने त्याचे नाव किशोर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने पांढरे रंगाच्या होंडा सिटी गाडी नं. एम.एच. 10 बी.ए.9414 ही न्यायाधीश श्री. निकम हे स्वत: चालवित आम्ही थांबलेल्या ठिकाणी पोहोचले त्यानंतर खाजगी इसम किशोर हा स्वत: ड्रायव्हर शिटचे बाजुच्या शिटवर म्हणजेच न्यायाधीश श्री. निकम साहेब यांच्या बाजुला बसले व त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी होंडा सिटी गाडी नं. एम.एच. 10 बी.ए.9414 हीचे मागील सिटवर जाऊन बसले. तेव्हा न्यायाधीश श्री. निकम साहेब व किशोर यांचेसोबत इतर विषयावर चर्चा झाली व नंतर किशोर यांनी न्यायाधीश श्री. निकम साहेब यांना विचारले की, उदया होईल ना एम.एस.ई.बी.च त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेब बोलले की, होईल की, आज नव्हत ना मला वाटत असे खाजगी इसम किशोर यांना बोलले त्यानंतर खाजगी इसम किशोर हा न्यायाधीश श्री. निकम साहेबांना म्हणाला की, आज नव्हत ना उदयाय, चालल सकाळी करुन टाका, किती वाजेपर्यंत अकरा? असे किशोरने न्यायाधीश श्री. निकम साहेब यांना विचारले तेव्हा न्यायाधीश श्री. निकम साहेबांनी आं असे प्रश्नार्थक विचारले त्यावर खाजगी इसम श्री. किशोर यांनी न्यायाधीश श्री. निकम साहेबांना 11 वाजेपर्यंत करा की असे बोलला त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेबांनी आं असे पुन्हा एकदा प्रश्नार्थक विचारले त्यावर खाजगी इसम किशोर याने न्यायाधीश श्री. निकम साहेबांना बोलला की, आकरा बारा वाजेपर्यंत त्यांना पुण्याला जायचय ना परत. त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेब चालल असे म्हणाले त्यानंतर खाजगी इसम किशोर हे न्यायाधीश श्री. निकम साहेबांना बोलले की, तो माणुस आला पाहीजे ना बाहेर त्यावर न्यायाधीश श्री. साहेब चालल असे परत एकदा म्हणाले त्यानंतर खाजगी इसम किशोर हा न्यायाधीश श्री. निकम साहेबांना म्हणाला की, हाय कनाय, गेल्या गेल्या करुन टाका त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेब हं.. असे म्हणाले त्यानंतर न्यायाधीश श्री. निकम साहेब यांनी किशोर यांचेशी दुस-या विषयावर अवांतर बोलणी केली व नंतर खाजगी इसम किशोर याने न्यायाधीश श्री. निकम साहेबांना फोन करतो की तुम्हाला अं मग बाकीच कस करायच सांगा उदया एमएसईबी असे न्यायाधीश साहेबांना उद्देशून बोलला, त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेब त्यास बोला असे बोलले. त्यानंतर



सातारा शहर पोलीस स्टेशन
सातारा

खाजगी इसम किशोर यांनी मला गाडीचे खाली उतरुन थांबण्यास सांगितले, त्यानंतर खाजगी इसम किशोर सुध्दा खाली उतरला व मला म्हणाला की, आता दोस्ती करायची आमच्याबरोबर, काय काय असल ना अडचण तर आयुष्यभर मदत करणार कधी कुठ लागल तर असे बोलले त्यावर मी त्यांना चालल ठिकय असे त्यांना बोलले त्यानंतर खाजगी इसम किशोर मला म्हणाला की, तुमची पण दोघांची फ्रेंडशिप करुन देतो. अस काय नाय, देऊ का आता फ्रेंडशिप करुन तेव्हा मी त्यांना दिली असती तर बर वाटल असत असे म्हणाले त्यानंतर किशोर हा न्यायाधीश श्री. निकम साहेबांकडे परत जाऊन मला ड्रायव्हर सिटचे बाजूला असणारे काचेजवळ घेऊन गेला व माझी ओळख करुन देताना त्याने न्यायाधीश श्री. निकम साहेब यांना सांगितले की, मैत्रीणय आपली त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेब म्हणाले की, बर बर बर असे म्हणाले त्यानंतर खाजगी इसम किशोर त्यांना म्हणाला की, फ्रेंडशिप करणारेय तुमच्याशी, जे आपल असल ते त्यानंतर न्यायाधीश श्री. निकम साहेब यांनी मला विचारले की, तुम्ही कुठ इथ राहतात तेव्हा मी त्यांना पुण्याहुन असे बोलले तेव्हा खाजगी इसम श्री. किशोर याने न्यायाधीश श्री. निकम साहेब यांना पुण्याहुन येणार तुम्हाला भेटणार हे करणार म्हणजे आपल फ्रेंडशिपसाठी असे न्यायाधीश श्री. निकम साहेब यांना बोलले. त्यावर न्यायाधीश श्री. निकम साहेब हा हा असे म्हणाले. त्यानंतर खाजगी इसम किशोर हा न्यायाधीश श्री. निकम साहेबांना म्हणाला की, कधी काय गरज लागली तर मदत कराय लागल आपल्याला. कधी लागल आयुष्यात, भविष्यात असे म्हणाले त्यावर न्यायाधीश साहेबांनी मला पुण्यात कुठ? असे विचारले असता मी खडकी येथे राहत असल्याचे सांगितले त्यानंतर न्यायाधीश साहेबांचे गाडीत खाजगी इसम किशोर जाऊन बसले. यावर मी दुपारी कोर्टात पंचासमक्ष जावुन डायसवर बसलेली व्यक्ती व आता गाडीत असेलेली व्यक्ती ही एकच असल्याची माझी खात्री झाली.

दिनांक 10/12/2024 रोजी सम्राट जाधव व किशोर नावाचा खाजगी व्यक्ती लाच स्विकारणार असल्याने त्यांना विलासपुर, सातारा येथील मानसी इन या हॉटेलमध्ये लाच रक्कम देण्याचे लाप्रवि विभागाचे दिनांक 10/12/2024 रोजी सम्राट जाधव व किशोर नावाचा खाजगी व्यक्ती लाच स्विकारणार असल्याने त्यांना विलासपुर, सातारा येथील मानसी इन या हॉटेलमध्ये लाच रक्कम देण्याचे लाप्रवि विभागाचे श्री. अनिल कटके व सर्वानुमते ठरविले व त्यानुसार मी आज रोजी माझ्या आईचे बचतीतील रू. 70,000/- लाच रक्कम सापळा पथकातील पोलीस उप अधीक्षक श्री. कटके साहेब यांचेकडे हजर केली त्यानंतर मी दिलेल्या लाच रकमेला अँन्थ्रासीन पावडर लावून रू. 4,30,000/- रकमेच्या चलनी नोटांप्रमाणे दिसणा-या खेळण्यातील नोटा असे रू. 5,00,000/- रक्कम पुर्ण करुन पिशवीत ठेवली त्यादरम्यान मला माझे मोबाईलवर सम्राट जाधव नावाचे व्यक्तीचा फोन आला तो मी उचलला नाही त्यानंतर पुन्हा एकदा त्याचा मला फोन आला तेव्हा मी त्यांना यांनी त्यास मी मानसी ईन हॅाटेल रुम नं 202 मध्ये मावसभावा बरोबर असल्याचे सांगितले. तसेच हा..बरोबर ये... हो येता मग तुम्ही इथच बसून थोड बोललो असतो.. चहा वैगरे घेतला असता, आण मग गेला जाता येईल तुम्ही मग जावा हं" असे म्हणाले असता, सम्राट जाधव मला म्हणाला की,, हो..ठिक्य चालंल चालंल" असे म्हणाला. त्यावर मी त्यास, हा मग इथूनच पैसे घेऊन जावा माझ्याकडंन आहे ना" असे म्हणाले. त्यावर तो मला म्हणाला की, अं लोकेशन पाठवताल" असे म्हणाला. मी त्यास, "" हो..हो..लगेच पाठवते... हा. सरांचा व्हॉट्सअपय लगेच पाठवते.. ......" असे म्हणाले. त्यावर त्याने , "" पाठवा हं.... असे सांगितले. त्यानंतर मी किशोर यांचे व्हॉटसअप वर लोकेशन पाठविले. त्यानंतर सम्राट जाधव व त्याचा मित्र तक्रारदार यांचेकडे पैसे घेणेकरीता येत असल्याचे दिसून आले.

त्यानंतर मी फोन केल्याप्रमाणे सम्राट जाधव हा त्यांचे गाडीवरील चालकासोबत माझे नमूद हॉटेलमधील रुममध्ये आला. त्यावेळी त्यास, "" किशोर सर नाय आले का याबाबत विचारणा केली असता , सम्राद जाधव हे, "" ते नाहीत असे म्हणाले. त्यानंतर आमचे इतर अवांतर चर्चा झाली. माझा पाय मुरळगल्याने मी बाहेर जावू शकत नाही तरी , मी त्यास, " देवु का मग हितच पैसे अशी विचारणा केली असता, सम्राट जाधव हा , " नाय त्याच्याकडच दया, साहेबांकडच दया असे म्हणाला, मी त्यास, "" खाली घेवु दया, मोजुन घेतले असते इथच समोर माझ्या, हा मग, माझ्या तसल्लीसाठी तरी "" असे म्हणाली. त्यावर जाधव हा , " एवढी मोठी अमाउंट, कधी बॅगी उचलत नाय, कधी मोजत नाय, आम्ही पैशाला तस कधी हात लावत नाय असे म्हणाला. त्यास मी," हं हं हं " असे म्हणाले. त्यावर तो मला पंच क्र. 1 श्री धिकार यांच्याकडे बोट करुन त्यांच्याकड दया, त्यांना आम्ही कोर्टात सोडतो असे म्हणाले तेव्हा मी त्यास, हं..हं कोर्टात कुठं घेवुन जाणार पैसे असे म्हणाले. यावेळी मावसभावाचे भुमीका करणारा पंच क्र 1 हे त्यास, तिकडच काय माहित नाय जास्त असे म्हणाला. त्यावर सम्राट जाधव हा आम्हास, " त्यांना घेवुन जातो, फास्ट, डायरेक्ट भावापाशी देवुन टाकतो. कोर्टात थांबतील मग दुपारपर्यंत ऑर्डर हुईल असे म्हणाला. मी त्यास, कुणाकडं सरांकडे ? अशी विचारणा केली असता तो , त्या सराकडे असे म्हणाले. मी त्यास पुन्हा , " सरांकडे अशी विचारणा करता तो, " लवकर ऑफिस चालु होयच्या आत तुम्हाला म्हणल होत ना, असे म्हणाला. मी त्यास, " अहो पण मला वाटल सराकडे का तुमच्याकडे दायची होते ना. असे म्हणाले. त्यावर आमचेत इतर चर्चा



सातारा शहर पोलीस स्टेशन
सातारा

झाली. त्यानंतर सम्राट जाधव याने किशोर यास फोन करुन, अं वरती येताय का, खालीच थांबताय काय, नाय ते त्यांची तब्येत बिघडलीय ना.. तस ते म्हणत्यात. तुम्ही घेउन जावा. त्याना घेवुन जावा, त्यांना म्हणले त्यांच्याकड द्या तुमच्या भावाकडे असे त्यांना म्हणाला. तसेच या वेळी पंच क्र 1 यांनी जाधव यांना, तिकडच काय माहीत नाय असे म्हणाला. जाधव हा आम्हाला कोर्टात घेवून जाणेचा आग्रह करत होता परंतु मी त्यास तब्येत बरी नसल्याने येवू शकत नाही असे सांगीतले. त्यानंतर सम्राट जाधव याचा मित्र किशोर हा मी थांबलेल्या रुममध्ये आला व मला म्हणाला की, " मला टेंशन कसं असतय माहीतीय का..जोपर्यंत काम होत नाही. असे म्हणाले. त्यावर मी त्यास बरोबरय असे म्हणाले. तसेच किशोर हा, हा..आमचे टेंशन जात. असे म्हणाला. त्यावर मी त्यास पंच क्र 1 यांना उद्देशून नाय तर हाला पाठवून देईल थोड्या वेळाने.... असे म्हणाले. त्यावर किशोर हे "माझ काय नाय जोपर्यंत होत नाय..तो पर्यंत आम्हाला धाकधुक वाटती ओ.... खरयं...ना... आंम्ही फ्रि झालो ना...आंम्ही म्हणजे तुंम्ही कसं आता धाकधुकीतय.... तसं आंम्ही पण धाकधुकीत येतोय ना कुठल म्हणजे आता असे म्हणाला. त्यावर मी त्यास, टेंशनतर राहणार. जोवर ऑर्डर येत नाही तोपर्यंत असे म्हणाली. त्यावर किशोर हा मला, " चालल मग ... आंम्ही पण जातो. असे म्हणाला. त्यानंतर मी त्यास, "मग. ते हे नाय करायचं का ....अशी विचारणा करता, किशोर हा मला, "काय असे म्हणाला, त्यावेळी सम्राट जाधव हा त्यास, मोजून घ्या..म्हणतात असे म्हणाला. त्यावर किशोर हा आंम्ही हो ...का...असंच नेणार..असंच ठेवणार.., ऑर्डर झाली कि..... आंम्ही पुढं देणार खोटं कशाला तुंम्हाला बोलु....सकाळी लवकर झाले असते ना...कॉन्टॅक्ट सकाळी त्यांना आपण अजून भेटणार होतो.... असे म्हणाला. तसेच किशोर हा, " सकाळी जाताना अजून एकदा भेटायचं होत. त्यांना ..कधी..कधी...असे म्हणाला. मी त्यास, आता म्हणजे देताच येणार नाय तुंम्हाला अशी विचारणा केली. त्यावेळी किशोर हा मला, त्यांचा आमच्यावर विश्वास ये जसा तुमचा आमच्यावर विश्वास ये... विश्वासावर अॅडजेस्टमेंट करायची.. काम झाल्यावर बघू...असे म्हणाला. त्यानंतर मी माझ्या सॅकमध्ये ठेवलेली पैशाची पिशवी बाहेर काढून, त्यांचेसमोर धरुन हे जज सराचे, निकम सराचेयत, असे त्यांना म्हणाले त्यानंतर ते मला बोलले की, तुम्हाला वाटतय ते करा जेवढ तुम्हाला वाटतय तेवढे ते नंतर करा असे म्हणाले. त्यानंतर आमचेत इतर चर्चा होवून किशोर हे पंच क्र 1 यांना उद्देशून, एक काम करा की खाली चला गाडीत आमच्या सोबत गाडीत ये गाडी लाव थांब तुम्ही दोघ तिकड आम्ही बरोबर येतोय खाली गेल्याय नाही का. आमच्या पण काय अडचणी असत्यात. आम्हाला पण लय टेन्शनय ओ. असे म्हणाला. मी त्यास "एवढ्या मोठ्या बॅगेत राहु दे ना हे असं. म्हणून लाच रकमेची पिशवी पुन्हा एकदा दाखविली. त्यानंतर किशोर हे पंच क्र 1 यांना उद्देशून, खाली बसा जावुन त्यांच्या हातातय असे म्हणाला.त्याप्रमाणे मी पंच क्र 1 यास , "" तु घे दादा ,तु घे "". असे म्हणाले. त्यानंतर ते रुममधून बाहेर निघून गेले. त्यानंतर मी लाच रकमेची पिशवी पंच क्र 1 याचेकडे दिली व त्यास त्यांचे मागे जाण्यास सांगीतले त्यानंतर ते तिघेजण जिन्याने खाली उतरत असताना त्यांना संशय आल्याने ते तिघेही लाच रक्कम न स्विकारता त्यांनी सोबत आणलेली इनोव्हा कार नं. एम.एच.16 बी.एच. 4499 ही हॉटेल बाहेर पार्क केलेल्या ठिकाणी सोडून पळून गेले आहेत. दरम्यान सदरचे इसम थांबलेल्या हॉटेल प्राईड येथे जावुन सापळा पथक यांनी जावुन अधिक चौकशी केली असता, सम्राट जाधव नावाचे व्यक्तीचे खरे नाव आनंद मोहन खरात, रा. खरातवस्ती, दहीवडी, ता. माण जि. सातारा असे त्यांनी हॉटेल बुक करतांना दिलेले आधार कार्ड पाहुन मी त्यावरील फोटो ओळखून सांगितले. तसेच किशोर या इसमाचे नाव किशोर संभाजी खरात, पत्ता 70/9, बी.डी.डी.चाळ, वरळी, मुंबई असे असल्याचे मला समजले.

तरी दि. 03/12/2024 रोजी व दि. 09/12/2024 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान इसम नामे आनंद मोहन खरात, (सम्राट जाधव) रा. खरातवस्ती, दहीवडी, ता. माण जि. सातारा व किशोर संभाजी खरात, (किशोर) पत्ता 70/9, बी.डी.डी.चाळ, वरळी, मुंबई यांनी सातारा जिल्हा न्यायाधीश श्री. धनंजय निकम (डी.एल.निकम) यांचेशी संगणमत करुन माझ्याकडून माझे वडीलांचे जिल्हा सत्र न्यायालय, सातारा या ठिकाणी दाखल असणारे जामीन अर्जाबाबत मदत करुन जामीन करुन देण्यासाठी न्यायाधीश श्री. निकम साहेब यांचेकरीता रु. 5,00,000 /- ची मागणी करुन स्वत:करीता स्वखुशीने काय करायचे ते करा असे म्हणून लाचेची मागणी केली आहे तसेच दिनांक 09/12/2024 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम किशोर खरात व आनंद खरात हे न्यायाधीश श्री. निकम यांच्या संपर्कात असणे, खाजगी इसम किशोर खरात व आनंद खरात यांच्या सांगण्यावरुन न्यायाधीश श्री. निकम हे त्यांच्या स्वत:च्या गाडीने स्वत: चालवित येऊन मी पक्षकार असतानासुध्दा व माझे वडीलांचे जामीनाचा अर्ज हा त्यांचेकडेच प्रलंबित असताना त्यांनी माझी न्यायालयाचे बाहेर न्यायालयीन वेळेनंतर भेट घेण्यास येणे, मला त्यांचे वाहनात बसवून माझेशी व खाजगी इसम किशोर यांचेशी माझे वडीलांचे जामीनाबाबत यापुर्वी ठरलेल्या एम.एस.ई.बी. या कोडवर्डमध्ये चर्चा करणे यावरुन न्यायाधीश श्री. निकम साहेब यांचे सांगण्यावरुन व त्यांच्या वतीने खाजगी इसम आनंद खरात व किशोर खरात हे माझ्याकडे लाच मागणी करण्यासाठी आले होते तसेच दि. 10/12/2024 रोजी न्यायाधीश श्री निकम साहेब यांच्या सांगण्यावरुन खाजगी इसम किशोर

खरात, आनंद खरात व त्यांचेसोबतचा अनोळखी इसम माझ्याकडे श्री. निकम यांच्यासाठी लाच रक्कम रु. 5,00,000/- स्विकारण्याकरीता येऊन लाच स्विकारण्याची तयारी दाखवून लाच रक्कम पंच क्र. 1 यांचे मार्फतीने गाडीत आणून दया असे सांगून लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष हा जबाब दिला. सही.

(अनिल कटके)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
Rajendra Bapu Maske(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**
**to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

सातारा शहर पोलीस स्टेशन

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Bapu Mask

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस स्टेशन ऑफिसर
सातारा शहर पोलीस ठाणे

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 4 | | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

सातारा शहर पोलीस स्टेशन सातारा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**